Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

279

Ramesh Warpudkar (ACS) College, Dist. Parbhani, Sonpeth

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रियांबाबत सुधारणावादी कार्य<br>**प्रा. कविता अशोक मोराडे** | ५८-६० |
| १४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**के. एस. तिडके** | ६१-६६ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि सामाजिक आशयाचे चित्रपट<br>**लक्ष्मीकांत साळूबा जाधव** | ६७-७० |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक व सामाजिक सुधारणा विषयक विचार<br>**प्रा. निखिल गणेश जगताप** | ७१-७५ |
| १७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार<br>**प्रा. विनायक यशवंत वनमोरे**<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब कोंडीबा माने** | ७६-८१ |
| १८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक विचार आणि सद्यस्थिती<br>**डॉ. सुनिता आत्माराम टेंगसे** | ८२-८८ |
| १९ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संबंधीचे विचार<br>**डॉ. सोमवंशी मुक्ता (गंगणे)** | ८९-९४ |
| २० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यता निवारणासंबंधी कार्य<br>**प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके** | ९५-९९ |
| २१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक समाज सुधारक<br>**डॉ. अंभुरे एस. डी.** | १००-१०४ |
| २२ | भारतीय संविधान आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. मोकळ प्रभाकर रामजी** | १०५-१०८ |
| २३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लहान राज्याविषयीचा दृष्टीकोण<br>**प्रा. सुभाष दामोदर** | १०९-११३ |
| २४ | आरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. बबिता येवले** | ११४-११७ |

# १९. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संसदीय लोकशाही संबंधीचे विचार

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

**डॉ. सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
सहयोगी प्राध्यापक तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जिल्हा - परभणी.

सारांश

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संपूर्ण जगाला ओळख आहे. त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व, बुद्धिमत्ता, त्यांची समाजाप्रती असलेली आस्था, मानवतावादी विचारसरणी यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर संपूर्ण जगाला परिचित आहेत. किंबहुना जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ती म्हणून त्यांची नोंद आलेली असे आहे. अशा या सर्व क्षेत्रात पांडित्य मिळवलेल्या व्यक्तीच्या द्वारे भारताची राज्यघटना निर्माण आलेली आहे. म्हणून भारतीय राज्यघटनेचे एक वेगळेपण असून, जगात सर्व सर्वोत्कृष्ट राज्यघटना म्हणून ओळखली जाते. भारतीय राज्यघटना ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील उत्कृष्ट राज्य घटनांचा अभ्यास करून तसेच तेथील परिस्थितीचा अभ्यास करून व भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वांगीण परिस्थितीचा परिपूर्ण अभ्यास करून ही राज्यघटना निर्माण केलेली आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटना सर्वोत्कृष्ट ठरली आहे. भारतीय राज्यघटनेनुसार भारताची शासन व्यवस्था बहात्तर वर्षापासून कार्यरत आहे. एकंदरीत भारताच्या विकासामध्ये भारतीय राज्यघटनेचा सिंहाचा वाटा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या राज्यघटने मुळेच भारतीय लोकशाही अद्यापपर्यंत कायम आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

भारतात लोकशाहीची स्थापना करीत असताना ती कोणत्या प्रकारची असावी. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले मत मांडत असताना असे म्हटले आहे की, "लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्त विरहित मार्गांनी घडवून आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय, जोपर्यंत आर्थिक आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित होत नाही तोपर्यंत राजकीय लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही"[१] असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ठाम मत होते. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांचे संसदीय शासन पद्धती वरील विचार व ही पद्धती भारतात स्वीकारण्याची कारणे यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कार्य अतिशय व्यापक स्वरूपाचे आहे. सागरासारखी अथांग बुद्धिमत्ता तसेच मानवतावादी विचाराने प्रभावित झालेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर आज सर्वत्र महामानव म्हणून ओळखले जातात. आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फार मोठे योगदान आहे. आपल्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत असताना डॉ.बाबासाहेबांनी केलेल्या कार्याची नोंद घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण स्वातंत्र्यानंतर प्रामुख्याने 26 जानेवारी 1950 रोजी राज्यघटनेची अंमलबजावणी करून आज सात दशकांमध्ये



286

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



भारताने जे काही साध्य केले आहे. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची मदत झाली आहे. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष स्थान स्वीकारून संपूर्ण राज्यघटना निर्मिती मध्ये सर्वाधिक कार्य करून या देशाला विकासाकडे घेऊन जाणारी राज्यघटना त्यांनी दिली आहे. रात्रंदिवस या देशाच्या प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांनी राज्यघटना लिहीली आहे. भारतीय संविधान जगातील सर्वात उत्कृष्ट व मोठे संविधान म्हणून ओळखले जाते. बाबासाहेबांच्या अथक प्रयत्नांमुळे विविधता असलेल्या भारत देशात एकात्मता वाढीस लागण्यास मदत झाली. जेव्हा-जेव्हा जेथे-जेथे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण झाली तेव्हा तेव्हा राज्यघटनेच्या आधारे अशा शक्तींचा बंदोबस्त करण्यात आला. विशेषतः बाबासाहेबांनी अत्यंत हुशारीने भारतीय संविधानाची प्रस्तावना दिली. ज्यायोगे या देशाचा प्रत्येक नागरिक राज्यघटनेला बांधील आहे. डॉ.बाबासाहेबांचे संपूर्ण विचार मानव जातीच्या उन्नतीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यांचे लोकशाही संबंधीचे विचार सुद्धा फार स्पष्ट आहेत. लोकशाहीची व्याख्या मानवी समाजात न्याय व समता प्रस्थापित करणारी आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर केलेला आहे. त्यामध्ये संदर्भग्रंथ , वर्तमानपत्र, मासिकांचा आधार घेतला आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संसदीय लोकशाही विषयीचे विचार स्पष्ट करणे.

२. डॉ. बाबासाहेबांचे विचार व आजच्या परिस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संसदीय शासन पद्धती विषयी वाटणारी भीती काही अंशी खरी ठरत आहे.

२. लोकशाहीच्या चौथ्या आधार स्तंभाची भूमिका डॉ.बाबासाहेबांच्या विचाराशी एकरूप होत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजात अमुलाग्र असे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे हे प्रयत्न दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी त्यांना भारतीय घटना समितीमध्ये जे स्थान मिळाले, त्यामुळे ते आजही मानव जातीच्या कल्याणासाठी उपयुक्त ठरत आहे. वास्तविकतः भारतीय राज्यघटना लिहीत असताना, भारतात कोणत्या प्रकारची लोकशाही शासन व्यवस्था असावी? याविषयी विचार करताना 'सुरुवातीस संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार करणारे बाबासाहेब नंतरच्या काळात अध्यक्षीय शासन पद्धतीकडे झुकलेले दिसतात. कारण त्यांना असे वाटत होते की, 'काही विशिष्ट परिस्थितीतच संसदीय प्रणाली नव्हे; अध्यक्षीय लोकशाहीच कार्यक्षम ठरू शकते. शिक्षणाचा प्रसार, लोकजागृती आणि सामाजिक व आर्थिक वर्गाचा अभाव या लोकशाहीच्या पूर्वअटी आहेत. भारतात अगदी याविरुद्ध परिस्थिती आहे. त्यामुळे या देशात सर्वमान्य सिद्धांतानुसार लोकशाही कार्यान्वित होऊ शकणार नाही .युरोपियन लोकात धर्मनिरपेक्ष राजकारणाची परंपरा खोलवर रुजली आहे. परंतु तेथे सुद्धा प्रातिनिधिक शासन पूर्णतः सर्वमान्य सिद्धांतानुसार कार्यान्वित होताना दिसत नाही .तेव्हा तेथे राजकारण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून क्रियाशील



282

Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Late Dist. Parbhani



धर्मच आहे; असे संस्कार बिंबविण्याचा प्रयत्न चालला आहे. तेथे ही शासनप्रणाली कशी कार्यक्षम ठरू शकेल'[२] अशी शंका त्यांना वाटत होती. मात्र भारतात अध्यक्षीय शासन पद्धतीचा विचार केल्यास त्यास पोषक वातावरण नसल्यामुळे इंग्लंडची संसदीय लोकशाही त्यांना योग्य वाटली.

भारताच्या दृष्टीने संसदीय लोकशाहीचा मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी फार विचारपूर्वक स्वीकारलेला आहे. विशिष्ट कालावधीनंतर व नियमीतपणे होणाऱ्या निवडणुका, उमेदवार निवडीचे मतदारांना पूर्ण स्वातंत्र्य, राजकीय पक्ष संघटित करण्याचे स्वातंत्र्य, प्रौढ मताधिकार, बहुमताने निर्णय घेणे, तसेच अल्पसंख्यांकांच्या हक्काचे संरक्षण, न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य यासारख्या बाबी संसदीय लोकशाहीत अंतर्भूत होतात. म्हणून संसदीय शासन पद्धती अधिक अनुकूल वाटली.

**संसदीय लोकशाहीचे स्वरूप**

1. संसदीय लोकशाहीमध्ये लोकमत हा सरकार बनवण्याचा मुख्य आधार असतो. सरकार बनविणे, पाडणे ही कामे लोकमताच्या आधारित होतात.
2. निवडणुका नियमित वेळात होतात. तसेच निवडणूक प्रक्रिया शक्य तितके निर्भय वातावरणात पार पाडली जाते. येथे मतदार स्वेच्छेने मतदान करू शकतात.
3. संसदीय शासन पद्धतीमध्ये मतदार, उमेदवार, लोकप्रतिनिधी या सर्वांच्या गुणांचा विकास होतो. सर्वांना समान संधी मिळाल्यामुळे जबाबदारीची व बांधिलकीची जाणीव वाढते.
4. संसदीय लोकशाहीमुळे रक्तपात क्रांती न होता राज्यकर्ते बदलले जातात.
5. संसदेत प्रत्येक प्रश्नावर चर्चा होते. वादविवाद होऊन उघडपणे लोकांच्या, प्रसिद्धी माध्यमांच्या साक्षीने विधेयके मंजूर होतात व फेटाळले जातात. अर्थसंकल्पावरही खुली चर्चा होते. यामुळे मतदारांच्या ज्ञानात भर पडते.
6. संसदीय लोकशाहीमध्ये अनेक पक्ष असतात. त्यांच्यामार्फत लोकमत घडविले जाते. विरोधीपक्ष सरकारच्या चुका सभागृहांमध्ये व प्रसारमाध्यमांमधून जनतेसमोर मांडतो. संसदीय शासन पद्धतीमुळे अनेक व्यक्तींना निवडणुका लढवून खासदार, आमदार, मंत्री होण्याची संधी असते.
7. संसदीय शासन पद्धतीमध्ये शासनावर संसदेचे प्रभावी नियंत्रण असते . शासनकर्ते किंवा कार्यकारी मंडळ हे लोकसभेला जबाबदार असल्यामुळे शासनावर अप्रत्यक्ष जनतेचे नियंत्रण प्रस्थापित होते. त्यामुळे हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका नसतो. या सर्व गोष्टींचा विचार करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात संसदीय शासन पद्धतीची राज्यघटना निर्माण केली.

राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार झाले आहे. परंतु या संसदीय लोकशाही बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सावधही केले होते 'विलंब लागणे या पद्धतीचा मोठा दोष आहे. प्रत्येक गोष्टीवर सतत चर्चा होत असल्यामुळे निर्णय घेण्यास वेळ लागतो. निर्णय झाला तरी नीट अंमलबजावणी होत नाही. दुसरा दोष म्हणजे या पद्धतीत संपन्न व प्रस्थापित गटाचे हितसंबंध सांभाळले जातात. लोक नाराज होतील या भीतीने क्रांतीकारक निर्णय घेतले जात नाहीत. लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य अशी व्याख्या केली जाते. पण प्रत्यक्षात लोकप्रतिनिधीच सर्व



283

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



ऐश्वर्य उपभोगतात.मतदारांना पाच वर्षात फक्त एकदा लोकशाही उपभोगण्याची संधी मिळते. शोषक व शोषित याप्रमाणे शासक व शासित अशी समाजात कायम विभागणी असते. भारतीय समाजात जातिभेद असल्याने भारतात संसदीय शासन लोकशाही यशस्वी होईल की नाही अशी शंकाही आंबेडकरांना वाटत असे' ३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ही शंका रास्त होती, हे आज सात दशकानंतरही दिसून येते. आपण स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. परंतु आपल्या देशातील राजकारण आजही जाती व धर्माच्या भोवती फिरताना दिसते. राजकारणी लोक आपल्या स्वार्थासाठी या देशातील जातीवाद आणि धर्मवादाला खतपाणी घालतात असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. किंवा इंग्रजांच्या नीतीचा आजच्या राजकारण्यांकडून काही अंशी अवलंब केला जातो. 'फोडा आणि राज्य करा' या उक्तीप्रमाणे जाती जातीमध्ये वाद निर्माण करून राज्यकर्ते आपली मनीषा पूर्ण करून घेतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात संसदीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी काही उपाययोजना सुचविल्या आहेत.

1. शिक्षण सार्वत्रिक झाले पाहिजे. निरक्षरता दूर व्हावी लोकांना संविधानाचे राज्यकारभाराचे ज्ञान आवश्यक आहे त्यादृष्टीने जाणीव जागृती झाली पाहिजे.
2. जुन्या रूढी कथा हद्दपार झाल्या पाहिजेत.
3. धर्म व जात यांचा आधार राजकारणासाठी येऊ नये.
4. प्रौढ मताधिकार एक व्यक्ती एक मूल्य याप्रमाणे दिला.
5. लोकांची लोकशाहीवर निष्ठा निर्माण झाली पाहिजे यासाठी भारतातील आर्थिक विषमता नष्ट करणे आवश्यक आहे.
6. उमेदवाराचे चारित्र्य व ज्ञान पाहून मतदान करावे. जातीकडे पाहून मतदान करणे म्हणजे लोकशाहीचा मृत्यू होय.
7. समाजात किमान ऐक्य भावना, परमत सहिष्णुता, परधर्म सहिष्णुता, जागरूकता आली तर लोकशाही भारतात यशस्वी होईल; तेव्हा या दृष्टीने उपाययोजना होणे गरजेचे आहे.
8. विभूती पूजा नसावी.४

या महत्त्वाच्या सूचना बाबासाहेबांनी त्यावेळी केल्या होत्या. मात्र आजच्या भारतीय लोकशाहीची अवस्था पाहता ती बाबासाहेबांच्या विचारांच्या अगदी विरुद्ध दिशेने जात आहे; असेच म्हणावे लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 'मत हा आपला अधिकार आहे ती दान करण्याची किंवा गहाण टाकण्याची किंवा विकण्याची वस्तू नाही. आपले मत 'अनमोल' आहे. ते आंधळेपणाने नव्हे तर डोळसपणाने दिले पाहिजे .निवडणुकीचे 'उमेदवार केंद्रित' रूप बदलून तिला आपण 'मतदार केंद्रित' केले पाहिजे. शोषणरहित, विषमतारहित समाज रचनेसाठी मतदार जागृत होणे फार महत्त्वाचे आहे'५

त्यांच्या या उपरोक्त विचारातून त्यांची लोकशाही प्रती असलेली आस्था स्पष्ट होते. तसेच खऱ्या लोकशाहीचे अस्तित्व मतदार राजावर अवलंबून असून ,प्रत्येकाने आपल्या अधिकाराचा विवेकाने वापर करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आहे. येथील व्यवस्थेला जवळून पाहिलेल्या बाबासाहेबांना भीती होती की येथील बहुतांश लोक निरक्षर



284

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani



अज्ञानी व रुढीवादी आहेत. त्यामुळे ते आमिषाला वळी पडू शकतात आणि त्यांची ही भीती किती रास्त होती हे आपणास अलीकडच्या लोकसभा ते ग्रामपंचायत निवडणुकांमधून दिसून येते. अलीकडच्या निवडणुकांमधील 'नोट के वदले वोट' ही प्रथा पडत आहे. तसेच व्यक्तीच्या चारित्र्याचा अभ्यास न करता जात धर्माच्या अनुषंगाने मतदान केले जाते. लोकांना भावनिक वनवून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न केला जातो.

संसदीय लोकशाही व्यवस्था यशस्वी करण्यासाठी डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी वृत्तपत्रांना विशेष महत्त्व दिले आहे. आजच्या काळात वृत्तपत्रावरोवरच अनेक वृत्तवाहिन्याही हे कार्य प्रभावीपणे करू शकतात. कारण माध्यमांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पाहिले जाते. ज्या प्रकारची अपेक्षा संविधानाने, वावासाहेवांनी वृत्तपत्रे अथवा माध्यमांकडून केली होती. त्याप्रमाणे माध्यमांनी आपली भूमिका पार पाडल्यास सत्ताधारी पक्षावर योग्य तो वचक आणि नियंत्रण राहू शकते.

मात्र अलीकडच्या काळामध्ये ही प्रसारमाध्यमे वहुतांश वेळा राजकीय पक्षांशी वांधील झालेली दिसून येतात. त्यामुळे कोठेतरी लोकशाही पद्धतीच्या मूल्यांना वाधा निर्माण होऊन ती दुर्लक्षित होत आहेत. यामुळे संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून ज्या अपेक्षा ठेवल्या होत्या त्या प्रभावीत झाल्या आहेत. एकंदरीत पाहता डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी ज्या उद्देशाने भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली आहे. त्यास काही प्रसंगी नजरेआड करण्याचे काम काही राजकीय तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून होत आहे.

प्रस्तुत शोधनिवंध लिहिण्यासाठी निश्चित करण्यात आलेले गृहीत कृत्य क्रमांक एक 'डॉ. वावासाहेव आंवेडकरांना संसदीय शासन पद्धती विषयी वाटणारी शंका आज काही अंशी खरी ठरत आहे' हे या शोधनिवंधातून सत्य असल्याचे सिद्ध होते. कारण भारतात निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात धर्म, जात व पैसा यांचा वापर केला जात आहे. हे चित्र ग्रामपंचायत स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरावरील निवडणुकांमध्ये असल्याचे दिसते. यामुळे योग्य उमेदवाराची निवड करणे मतदारांनाही कठीण होत आहे. तसेच आज अनेक मतदारांचा असा भ्रम झाला आहे की, स्थानिक निवडणुका म्हणजे पैसे मिळवण्याचे माध्यम आहे. उमेदवारांकडून पैसा घेत असताना मतदार राजाही वावासाहेवांच्या लोकशाही प्रति असलेल्या विचारांना स्मरत नाही. ही मोठी शोकांतिका आहे.

दुसरे गृहीत कृत्य 'लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची भूमिका वावासाहेवांना अपेक्षित राहिलेली नाही' डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी प्रसारमाध्यमांची भूमिका फार महत्त्वाची असल्याचे मत मांडले. त्यांनी योग्य ती वाजू जनतेसमोर आणली पाहिजे. जेणे करून सरकारचे कार्यक्रम, योजना तसेच चुका जनतेला समजू शकतील. परंतु आजची प्रसार माध्यमे ही कोणत्यातरी राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली कार्य करतात. त्यामुळे योग्य वाजू जनतेच्या समोर येत नाही, हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे शोधनिवंधाचे दुसरे गृहीत कृत्यही सत्य असल्याचे सिद्ध होते.

### निष्कर्ष व समारोप

डॉ. वावासाहेव आंवेडकरांनी लोकशाही ही प्रस्थापितांची वटीक होऊ नये. म्हणून लोकांच्या कल्याणाच्या दृष्टीने सामाजिक आर्थिक धोरणांचा अंतर्भाव संविधानात करण्याचा आग्रह केला होता आणि त्यांनी अनेक महत्त्वाच्या तरतुदी भारतीय राज्यघटनेत केल्या आहेत. सर्वांना समान संधी, कायद्यापुढे समानता, स्वातंत्र्य व वंधुता अशा महत्त्वाच्या

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth • Dist. Parbhani



तरतुदी भारतीय राज्यघटनेत करून उत्कृष्ट संविधान बनविण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. त्यामुळे भारतीय राज्यघटनेतील प्रत्येक कलम देशाच्या व देशातील प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तयार करण्यात आले आहे. यासाठी 2 वर्ष 11 महिने 17 दिवसाचा प्रदीर्घ कालावधी लागला. प्रत्येक कलमावर सूक्ष्मपणे अभ्यास केला, असे असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंतिम राज्यघटना समितीच्या अध्यक्षांकडे सुपूर्द करीत असताना काढलेले उद्गार फार महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे "घटना कितीही चांगली असली तरी ती वापरणारे माणसे जर चांगली नसतील तर घटना निश्चितच वाईट ठरेल. घटना काय करते? फक्त राष्ट्राचा देह घडविते. भारताची जनता आणि तिचे निरनिराळे राजकीय नेते कसे वागतील, हे कोणी सांगावे? आपले हेतू साध्य करण्याकरिता ते घटनात्मक मार्गांचा अवलंब करतील, का क्रांतिकारक पद्धतीचा अवलंब करतील? बंडखोर मार्गांनी जाण्याचे त्यांनी ठरविल्यास घटना कितीही चांगली असली तरी कोलमडून पडेल..." अर्थात डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या राज्यघटनेची यशस्विता ही भारतातील प्रत्येक नागरिकाच्या वर्तनावर अवलंबून आहे.

संदर्भसूची

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा- संपादक शंकरराव खरात, बार्टी प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रमांक 223.
2. डॉ.ज. रा. शिंदे व डॉ.रेखा परळीकर-भारतीय विचारवंत, तिरुपती प्रकाशन औरंगाबाद, पृष्ठ क्रमांक 182.
3. डॉ.ना.य. डोळे प्रमुख भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद पृष्ठ क्रमांक 92 -93.
4. उपरोक्त पृष्ठ क्रमांक 94.
5. प्रबोधन प्रकाश ज्योती, एप्रिल 2015, लेखक प्रसाद कुलकर्णी, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ क्रमांक 14.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani